माहिती हवीय?

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ फिल्म स्टुडिओची स्थापना कोणी केली? प्रभातने निर्माण केलेले चित्रपट कोणकोणते? त्यातील आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवणारे चित्रपट कोणते?

– १९१५ साली *राजा हरिश्चंद्र* हा पहिला भारतीय चित्रपट निर्माण करताना दादासाहेब फाळकेनीच भारतात स्टुडिओची स्थापना केली. १९२९ साली गोपालकृष्ण हा मूकपट निर्माण करून प्रभातने चित्रपट निर्मितीची सुरुवात केली. त्यानंतर *राणीसाहेब*, *उदयकाल*, *चंद्रसेना*, *जुल्मु* हे मूकपट आणि *अयोध्येचा राजा* (हिंदी- *अयोध्या का राजा*) , *अग्निकंकण* (हिंदी- *जलती निशानी*) , *सैरंध्री* (हिंदी-मराठी) , *सिंहगड* (फक्त मराठी) , *अमृतमंथन* (हिंदी-मराठी) , *चंद्रसेना* (हिंदी-मराठी) , *धर्मात्मा* (हिंदी-मराठी) , *कुंकू* (हिंदी- *दुनिया न माने*) , *संत तुकाराम* (फक्त मराठी) , *अमरज्योती* (फक्त हिंदी) , *रजपूत रमणी* (फक्त हिंदी) , *वहाँ* (फक्त हिंदी) , *माझा मुलगा* (हिंदी- *मेरा लडका*) , *गोपालकृष्ण* (हिंदी-मराठी) , *माणूस* (हिंदी-*आदमी*) , *संत ज्ञानेश्वर* (हिंदी-मराठी) , *शेजारी* (हिंदी-*पडोसी*) , *संत सखू* (हिंदी-मराठी) , *दहा वाजता* (हिंदी- *दस बजे*) , *नई कहानी* (फक्त हिंदी) , *रामशास्त्री* (हिंदी-मराठी) , *चांद*, *हम एक है*, *गोकूल*, *आगे बढो*, *सीधा रास्ता* (सर्व हिंदी) , *संत जनाबाई* (हिंदी-मराठी) , *श्री गुरुदेव दत्त* (मराठी) , *गजगौरी* (हिंदी) हे हिंदी-मराठी चित्रपट प्रभातने निर्माण केले. या चित्रपटांपैकी *संत तुकाराम*, *संत ज्ञानेश्वर*, *रामशास्त्री* या चित्रपटांची परदेशात प्रशंसा झाली.

अनिकेत मारुती कोळी, नवघर.

□ मीनाक्षी शेषाद्रीचा पहिला चित्रपट कोणता?

– *पेन्टरबाबू*.

□ अमिताभने डबल रोल केलेला पहिला चित्रपट कोणता?

– *बंधे हाथ*.

□ जॅकी श्रॉफ व मनीषा कोईराला यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *मिलन*, *रामशस्त्र*, *अग्निसाक्षी*.

□ जॅकी श्रॉफ व जुही चावला यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केल्या?

– *शतरंज*, *बंदिश*.

मारुती गणपत कोळी, नवघर.

□ मिथुन व पद्मिनी कोल्हापुरे यांनी एकत्र भूमिका केलेले चित्रपट कोणकोणते?

– *प्यार झुकता नही*, *प्यारी बहेना*, *ऐसा प्यार कहीं*, *मुद्दत*, *स्वर्ग से सुंदर*, *सागर संगम*, *दाता*, *दानापानी*, *हम इंतजार करेंगे*.

□ जितेंद्र व रीना रॉय यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

– *जैसे को तैसा*.

आर. आर. कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ सुनील दत्त व राज कपूर या दोघांनी किती चित्रपटात एकत्र भूमिका केली.

– कोणत्याच चित्रपटात नाही.

नरेश राजाराम कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ बलराज सहानी व निरुपा रॉय यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केल्या?



वैजयंतीमाला आणि दिलीपकुमार पैगाममध्ये

– *दो बिघा जमीन*, *गरम कोट*, *आसरा*, *तांगावाली*, *लाडला*, *दो रोटी*, *घर घर की कहानी*, *हीरा मोती*, *हम एक है*, *जवानी दीवानी*, *जवाँ मोहब्बत*, *कृष्ण सुदामा*, *प्यार का रिश्ता* आदी चित्रपटात.

□ प्रेमरोगची निर्मिती कोणी केली होती?

– राज कपूरने.

□ मोहनीश बहलचा पहिला चित्रपट कोणता?

– १९८४ चा *तेरी बाहो में*.

□ अक्षयकुमारचा पहिला चित्रपट कोणता?

– १९९१चा *सौगंध*.

मनोहर बाबूराव कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ काजोलचा पहिला चित्रपट कोणता? .

– *बेखुदी*.

□ शिल्पा शेट्टीचा पहिला चित्रपट कोणता?

– *बाजीगर*.

□ अमिताभ व गोविंदा यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *हम*, *बडे मियां छोटे मियां*.

□ सलमान खान व संजय दत्त यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *साजन*, *चल मेरे भाई*.

के. एम. कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ शाहरूख खानचा पहिला चित्रपट कोणता?

– *दिल तो आशना है*.

□ मनोजकुमारचा पहिला चित्रपट?

– *काँच की गुडिया*.

जिद्दी जीवन कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ धर्मेंद्र व हेमामालिनी यांनी किती चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *तुम हसीन मैं जवाँ*, *नया जमाना*, *शराफत*, *दो दिशाए*, *राजा जानी*, *सीता और गीता*, *जुगनू*, *दोस्त*, *ड्रीम गर्ल*, *पत्थर और पायल*, *प्रतिज्ञा*, *शोले*, *चरस*, *चाचा भतीजा*, *मा*. *आझाद*, *दिल्लगी*, *द बर्निंग ट्रेन*, *दिल का हीरा*, *आसपास*, *अलिबाबा और चालीस चोर*, *राजतिलक*, *बगावत*, *सम्राट*, *रझिया सुलतान*, *जान हथेली पे*, *खेल खिलाडी का*, *क्रोधी*, *बारूद* (पाहुणे कलाकार) .

□ अमिताभ व जया बच्चन यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *बन्सी बिरजू*, *एक नजर*, *अभिमान*, *जंजीर*, *शोले*, *मिली*, *सिलसिला*.

चैताली चंद्रकांत कोळी, वरेडी पेण.

□ रेखा व अमिताभचा पहिला चित्रपट कोणता?

– *दो अनजाने*.

□ राणी मुखर्जी व प्रीती झिंटा यांचा पहिला चित्रपट कोणता?

– राणीचा पहिला चित्रपट *गुलाम*, प्रीटी झिंटाचा पहिला चित्रपट *दिल से*.

□ विजय आनंदचा पहिला चित्रपट कोणता?

– अभिनेता म्हणून विजय आनंदचा पहिला चित्रपट *जोरू का गुलाम*. दिग्दर्शक म्हणून पहिला चित्रपट *नौ दो ग्यारह*.

□ राजकुमारचा पहिला चित्रपट?

– १९५२चा *रंगीली*.

प्रतिभा प्रकाश कोळी, वरेडी पेण.

□ मनोज वाजपेयीचा पहिला चित्रपट?

– *बॅण्डिट क्वीन*.

□ कादर खानने भूमिका केलेला पहिला चित्रपट?

– *बैराग*.